## राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ

क्र.म.वि. 2038 /9/10
दिनांक– 1.8.08

प्रति,
अध्यक्ष / सचिव,
झेड व्होकेशनल ट्रेनिंग ॲण्ड जनरल सेंट्रल शिक्षण संस्था,
व्दारा–झुलेखा कॉलेज ऑफ एज्युकेशन,
38, 39 शांतीनगर, नागपूर.

विषय :– सत्र 2008–09 पासुन नविन महाविद्यालय सुरु करण्यास प्रथम संलग्निकरण प्रदान करण्याबाबत.

संदर्भ :– 1.शासन पत्र क्र. बी.एड्.मान्यता–2008 / (162 / 08) / मशि–1, दि. 10 जुन, 2008.
2.एन.सी.टी.ई.चे दिनांक 26–02–2008 चे पत्र.

महोदय,

उपरोक्त संदर्भांकित पत्रानूसार राज्य शासनाने व एन.सी.टी.ई. ने आपल्या संस्थेला सत्र 2008–09 पासुन बी.एड्. अभ्यासक्रमाचे नविन अध्यापक महाविद्यालय सुरु करण्यास दिलेल्या परवानगीनूसार विव्दत परिषदेच्या वतीने मा.कुलगुरुंनी म.वि. अधिनियम 1994 च्या कलम 14(7) अंतर्गत नविन महाविद्यालयास सत्र 2008–09 पासुन खालीलप्रमाणे प्रथम संलग्निकरण प्रदान करण्यास मान्यता प्रदान केली आहे.

| संस्थेचे नांव | महाविद्यालयाचे नांव व ठिकाण | विद्याशाखा / अभ्यासक्रम | विद्यार्थी संख्येचे निकष |
|---|---|---|---|
| झेड व्होकेशनल ट्रेनिंग ॲण्ड जनरल सेंट्रल शिक्षण संस्था,नागपूर. | झुलेखा कॉलेज ऑफ एज्युकेशन, 38, 39 शांतीनगर, नागपूर. | शिक्षण विद्याशाखा बी.एड्. (मराठी माध्यम) | 100 विद्यार्थी |

प्रथम संलग्निकरण खालील अटींच्या अधिन देण्यात येत आहे.

1. उपरोक्त नविन महाविद्यालयाला देण्यात आलेले प्रथम संलग्निकरण विद्यापीठाद्वारे गठीत करण्यात येणाऱ्या स्थानिय चौकशी समितीच्या शिफारशीच्या अधिनस्त राहून देण्यात आले आहे.
2. एन.सी.टी.ई ने दिलेल्या परवानगीत घातलेल्या अटींची पुर्तता करण्यात यावी.
3. उपरोक्त महाविद्यालय कायम विना अनुदान तत्वावर सुरु करण्यास आपले महाविद्यालय तयार असून त्या आशयाचे हमीपत्र महाविद्यालयाने विभागीय सहसंचालक (उच्च. शिक्षण) नागपूर यांना सादर करण्याचे अटीवर ही मान्यता देण्यात येत आहे.
4. या महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या आर्थिक बाबी संबंधी सर्वस्वी जबाबदारी स्विकारणे संस्थेवर बंधनकारक राहील.
5. कायम विना अनुदान तत्वावर संस्थेस महाविद्यालय आर्थिकदृष्ट्या चालविणे शक्य व्हावे यासाठी संस्थेने विद्यार्थ्यांकडून किती शुल्क आकारावे हे राज्याच्या शिक्षण शुल्क समितीकडून ठरवून घ्यावे.
6. शासनाने मान्यता दिलेल्या अभ्यासक्रमांपैकी ज्या अभ्यासक्रमांना राज्य शासना मार्फत केंद्रिकृत प्रवेश पध्दतीने प्रवेश दिले जातात अशा अभ्यासक्रमासाठी चालू वर्षासाठी प्रक्रिया पूर्ण झाली असल्यास ते अभ्यासक्रम पुढील वर्षापासून संबंधित महाविद्यालयांनी सुरु करावेत

कृपया कळावे.

आपला,

(स्वाक्षरी)
सहायक कुलसचिव (म.वि.)
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज,नागपूर विद्यापीठ

Principal
Zulekha College of Educ
Plot No.38/39, Main R
Shanti Nagar, Nagpur-4

प्रतिलिपी माहितीकरिता सादर:–
1. संचालक उच्च शिक्षण,महाराष्ट्र राज्य मध्यवर्ती इमारत पुणे,
2. सहसंचालक, (उच्च शिक्षण), नागपूर विभाग,नागपूर,
3. संचालक बी.सी.यु.डी.,
4. वित्त व लेखा अधिकारी,
5. परिक्षा नियंत्रक,
6. उपकुलसचिव विद्या विभाग,
7. सहायक कुलसचिव, परिक्षा विभाग, गोपनिय विभाग, व्यावसायिक परिक्षा, परिक्षा व चौकशी,
8. संबंधित लिपीक,, शिक्षक मान्यता,
9. संबंधित लिपीक, संलग्निकरण शाखा,
यांना विनंती करण्यात येते की, त्यांनी आपल्या स्तरावर आवश्यक ती कार्यवाही करावी.

Principal
Zulekha College of Educa
Plot No.38/39, Main Ro
Shanti Nagar Nagpur-44